आर.सी.सी.क्रं.१४४/२०१५

नि. क्रमांक १०३.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ११ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- राजेश बबन कर्डीले,

वय सुमारे :- ५२ वर्षे, व्यवसाय :- पोलीस उपनिरीक्षक,

नेमणुक. :-रांजनगाव, एम आय डी सी. पोलीस ठाणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस. एस. पवार यांच्यामार्फत.**

दि. १६/०७/२०१४ रोजी मी वडगाव मावळ पोलीस ठाण्यामध्ये पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. मी पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असताना गु. र. क्र. १५७/२०१४ तपासासाठी माझ्याकडे वर्ग केला होता. सदरचा तपास हा सहाय्यक फौजदार मुजावर यांची बदली झाल्यामुळे माझ्याकडे देण्यात आला होता. तपासादरम्यान मी तीन साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासादरम्यान मी आरोपी क्र. १ याने ज्या ठिकाणी दुसरे लग्न केले होते तेथून कागदपत्र हस्तगत केले. आरोपी क्र. १ याने आळंदी येथे लग्न केले होते तेथून लग्नाचा दाखला हस्तगत केला. लग्नाचा दाखला व प्रतिज्ञापत्र आरोपी क्र. १ याची दुसरी बायको स्नेहा कर्पे हिच्याकडून हस्तगत केला.आता मला लग्नाच्या दाखल्याची व प्रतिज्ञापत्राची झेरॉक्स प्रत दाखवण्यात आली. झेरॉक्स प्रतीस आर्टीकल अ देण्यात येते व प्रतिज्ञापत्रास आर्टीकल ब देण्यात येते. आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरुध्द अंतिम दोषारोपत्र दाखल केले.

०२. तपासामध्ये मला असे दिसून आले की, आरोपींनी आपआपसांत संगनमत करुन खबरीस दोन लाख रुपये हुंडा म्हणून मागितला व हुंडा न दिल्यामुळे आरोपींनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र. १ आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. व्ही. डी. पिंपळे यांच्या तर्फे शपथेवर सुरु.**

०३. खबरीचा जबाब मी नोंदवला नव्हता. मी राजू वाडेकर, स्नेहा कर्पे व तीची आई यांचा जबाब नोंदवला होता. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार राजू वाडेकर याचा जबाब मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला नाही. स्नेहा कर्पे हिने तिच्या साक्षीमध्ये आरोपी क्र. १ नवनाथ वाडेकर हा तिचा कोणीही लागत नसल्याचे व ती त्यास ओळखत नसल्याचे सांगितल्याचे मला माहित नाही. लता कर्पे हिने तिच्या साक्षीमध्ये ती आरोपी क्र. १ यास ओळखत नसल्याचे सांगितल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, लता कर्पे व स्नेहा कर्पे यांचा जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जप्त केलेला लग्नाचा दाखला आर्टीकल अ हा कोणत्याही शासकिय संस्थेने दिलेला दाखला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल ब कडील प्रतिज्ञापत्र हे स्नेहा कर्पे हिचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन खोटे दोषारोपपत्र आरोपिंविरुध्द दाखल केलेले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/xxx

**दिनांक. ०४/०८/२०२६.**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडगाव,**

**ता.मावळ, जि. पुणे.**